महानगरपालिका, नगर परिषदा / नगर पंचायती निवडणुकांमध्ये बॅलेट युनिटवरील **"End"** बटनाच्या वापराबाबत...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**क्रमांक-मनप-२०११ / प्र.क्र. २१ / का-०५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- ३१ जानेवारी, २०१२**

## आ दे श

महाराष्ट्रातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्यासंबंधीचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-मनप-२००४/प्र.क्र.२/का-०६, दिनांक-१३ एप्रिल, २००४ व क्रमांक-रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.१३/का-५, दिनांक- ७ जानेवारी, २००५ अन्वये निर्गमित केले आहेत.

२. राज्य निवडणूक आयोगाने घेतलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात एकापेक्षा अधिक मते देण्याची सोय असून एकच कंट्रोल युनिट वापरून एकापेक्षा जास्त पदांसाठी मते देता येतात.

३. बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता इतर महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय पध्दत अंमलात आल्यामुळे क्रमांक-मनप-२०११/प्र.क्र.२१/का-०५ दिनांक- ५ डिसेंबर, २०११ अन्वये मतदान यंत्राच्या बॅलेट युनिटवरील **"End"** बटनाचा वापर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

४. त्यानुसार ज्या महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये दोन अथवा अधिक पदांसाठी मतदान करावयाचे असेल तेथे **"End"** बटन वापरावयाचे आहे. साधारणपणे मतदाराकडून सर्व पदांसाठी मतदान केल्यावर **"End"** बटनाचा वापर करण्याची आवश्यकता नाही. जेथे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र एकापेक्षा अधिक मतांसाठी सेट केले असेल तेथे अपवादात्मक परिस्थितीमध्ये जर एखादया मतदाराने त्या पदांपैकी एका पदाकरिता किंवा कोणत्याही पदासाठी मतदान केले नाही तर त्या ठिकाणी मतदार अथवा यथास्थिती केंद्राध्यक्ष **"End"** बटनाचा वापर करतील.

५. काही परीस्थितीत मतदार मतदान केंद्राध्यक्षांच्या अपरोक्ष **"End"** बटन वापरण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक जागानिहाय झालेल्या मतदानाची आकडेवारी निकालाच्यावेळीच मतदान यंत्रावर पुढीलप्रमाणे दिसून येईल.

६. मतदान यंत्रावर **" TOTAL VOTERS"** हा डिस्प्ले एकूण मतदाराची संख्या दर्शवेल तर **"BALLOT 1 VOTES - - "** हा डिस्प्ले त्या मतपत्रिकेवर झालेल्या एकूण मतदानाची संख्या

दर्शवेल. त्यामुळे त्या मतपत्रिकेवर असलेल्या सर्व उमेदवारांना मिळून झालेल्या मतदारांची बेरीज ही **"BALLOT 1 VOTES - - "** या एकूण मतदानाच्या संख्येशी जुळेल, मात्र **"TOTAL VOTERS "** या डिस्प्लेवर दिसणा-या एकूण मतदारांच्या संख्येशी जुळणार नाही. याप्रमाणे यथास्थिती **"BALLOT 2 VOTES - -" , "BALLOT 3 VOTES - - "** इत्यादी ठिकाणीदेखील याप्रमाणे मतदानाची आकडेवारी जुळेल.

७. ज्यावेळी मतदान यंत्रावरील **"End"** बटन सुरु असेल त्यावेळी निवडणूक निर्णय अधिका-यांनी मतदान यंत्र सेट व सील करताना अथवा उमेदवा-यांच्या बैठकीमध्ये मतदान यंत्रावरील **"End"** बटनाच्या वापरामुळे एकूण मतदार व मतपत्रिकेवर प्रत्यक्ष झालेले मतदान यामध्ये फरक येण्याची शक्यता असल्याबाबत स्पष्ट कल्पना द्यावी जेणेकरुन नंतर वाद निर्माण होणार नाही.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

धमाकानेड

**(ध.मा.कानेड)**
**अवर सचिव**
**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

प्रति,

सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
निवड नस्ती